आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१५ डिसेंबर २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्रातल्या नवनिर्वाचित सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार आज नागपुरात होणार
- भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन
- एक राष्ट्र एक निवडणूक विषयी दोन विधेयकं उद्या लोकसभेत सादर होणार

  **आणि**

- उत्तर, मध्य आणि पश्चिम महाराष्ट्रात येत्या २ ते ३ दिवसांत थंडीची लाट येणार असल्याचा हवामान विभागाचा अंदाज

**<><><><><>**

महाराष्ट्रतल्या नवनिर्वाचित सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार आज सायंकाळी चार वाजता नागपूर इथं राजभवनात होणार आहे. उद्यापासून राज्य विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन नागपुरात होत आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हे काही वेळापूर्वीच नागपुरात दाखल झाले आहेत. रा

जभवनात होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या विस्तारात भाजपाकडून ज्येष्ठ आमदार चंद्रशेखर बावनकुळे, चंद्रकांत पाटील, राधाकृष्ण विखे पाटील, गरीश महाजन, आशिष शेलार यांच्यासह मराठवाड्यातील पंकजा मुंडे, अतुल सावे, मेघना बोर्डीकर आदी १९ जण मंत्रीपदाची शपथ घेणार असल्याचं वृत्त आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून आमदार हसन मुश्रीफ, नरहरी झिरवळ, अनिल पाटील, आदिती तटकरे, बाबासाहेब पाटील, इंद्रनील नाईक यांच्यासह ९ जणांचा समावेश होणार असल्याची चर्चा आहे.

तसंच शिवसेना पक्षाकडून आमदार उदय सामंत, दादा भुसे, गुलाबराव पाटील, संजय शिरसाट यांच्यासह १२ जणांना मंत्रीपदाची शपथ देण्यात येणार असल्याचं वृत्त आहे.

विमानतळावर वार्ताहरांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांचा संविधानानं निर्माण केलेल्या संस्थांवर विश्वास नसल्याची टीका केली. दरम्यान, सायंकाळी मंत्रीमंडळाच्या विस्तारानंतर राज्य मंत्रिमंडळाची बैठक मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी होणार असून, त्यानंतर सायंकाळी ६ वाजता मुख्यमंत्री फडणवीस पत्रकार परिषद घेणार आहेत.

**<><><><><>**

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज त्यांना आदरांजली वाहिली.सरदार वल्लभभाई पटेल यांचं व्यक्तिमत्व आणि कार्य, राष्ट्राची एकता, अखंडता तसंच, विकसित भारताची संकल्पपूर्ती याकरिता देशवासीयांसाठी प्रेरणास्थान राहील, असं प्रधानमंत्री मोदी यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

गृहमंत्री अमित शहा यांनीही सरदार वल्लभभाई पटेल यांना त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज आदरांजली वाहिली. सरदार वल्लभभाई पटेल यांनी ५५० हून अधिक संस्थानांचं एकत्रीकरण केलं, आधुनिक भारताच्या निर्मितीची पायाभरणी करून एक भारत, श्रेष्ठ भारत' चा पाया रचला, असं शहा यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

क्षयरोगमुक्त भारत या मोहिमेच्या जनजागृतीसाठी आज नवी दिल्लीत मेजर ध्यानचंद राष्ट्रीय क्रीडांगणात क्रिकेटचा मैत्रीपूर्ण सामना होणार आहे. सभापती ओम बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली आज या उपक्रमाचं उदघाटन झालं. पुढल्या वर्षीपर्यंत

भारत क्षयरोग मुक्त करण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा संकल्प असल्याचं ओम बिर्ला यांनी यावेळी सांगितलं.

या विशेष सामन्यात विविध राजकीय पक्षांचे खासदार भाग घेणार आहेत. या सामन्यात दोन संघ असून लोकसभा सभापती ११ या संघाचं नेतृत्व माजी मंत्री खासदार अनुराग ठाकूर करणार असून राज्यसभा अध्यक्ष ११ या संघाचं नेतृत्व केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू करणार आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज दिल्लीमध्ये मुख्य सचिवांच्या चौथ्या संमेलनाला संबोधित करणार आहेत. तीन दिवस होणाऱ्या या संमेलनाला प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी सुरुवात झाली. राज्यांच्या मदतीनं साधलेल्या विकासाचं मूल्यमापन करणं आणि कार्यान्वित करणं, हा या संमेलनामागचा उद्देश आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या एकत्रित भागीदारीला सशक्त करणं तसंच सहकारी संघराज्यवाद, जलद आर्थिक वृद्धी आणि विकासामधे योग्य ताळमेळ हे या संमेलनातल्या चर्चेचे विषय आहेत. या संमेलनात सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव, वरिष्ठ अधिकारी आणि तज्ञ सहभागी झाले आहेत.

**<><><><><>**

एक राष्ट्र एक निवडणूक या विषयी दोन विधेयकं उद्या लोकसभेत सादर करण्यात येणार आहेत. कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल संविधान विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदा विधेयकदेखील उद्या संसदेत सादर करतील. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळाने गुरुवारी लोकसभा आणि राज्यसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याविषयीच्या विधेयकाला मंजुरी दिली होती. प्रस्तावित संविधान संशोधन विधेयकामधे लोकसभा आणि राज्यसभा निवडणुका एकाच दिवशी करण्यासंबंधी तरतूद असेल. माजी राष्ट्रपती रामनाथ

कोविंद यांच्या उच्च स्तरीय समितीनं लोकसभा आणि राज्यसभेसाठी देशात एक राष्ट्र एक निवडणूक हा प्रस्ताव मांडला होता.

वन नेशन, वन इलेक्शन विधेयक हे संघराज्यवादाच्या तत्त्वांना तडा देत असल्याचा आरोप केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी फेटाळून लावला आहे. नवी दिल्लीत  एका वृत्तवाहिनीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

**<><><><><>**

उत्तर, मध्य आणि पश्चिम महाराष्ट्रात येत्या २ ते ३ दिवसांत थंडीची लाट येणार असल्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. आजही मध्य प्रदेशातील काही भागात जोरदार थंडीची लाट कायम राहू शकते असंही सांगितलं. पंजाब, हरियाणा, चंदीगढ, उत्तर प्रदेश, छत्तीसगढ, पश्चिम बंगाल आणि ओदिशाच्या काही भागांमध्ये पुढील २ दिवस थंडीचा वाढता प्रभाव राहील असं हवामान विभागानं सांगितलं आहे. तसच जम्मू काश्मीर, लददाख, गिलगीट बाल्टिस्तान आणि मुजफ्फराबाद मध्ये देखील थंडी वाढण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**<><><><><>**

परभणी जिल्ह्यात गेल्या आठवड्यापासून थंडीचा जोर वाढत असून आज सर्वाधिक नीचांकी तापमान ४ पूर्णांक ६ शतांश अंश सेल्सिअस इतकं  नोंदवलं गेलं आहे.  वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या हवामान विभागाने हे तापमान नोंदवलं आहे. उत्तर भागात होणारी हिमवृष्टी आणि उत्तरेकडून येणार थंड वारे तसंच आपल्या भागात असलेलं कोरडे वातावरण यामुळे पारा खाली जात असल्याचं हवामान विभागानं सांगितलं  आहे.

**<><><><><>**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या जयगडमधल्या वायुगळतीच्या प्रकरणात जेएसडब्ल्यू पोर्ट लिमिटेड कंपनीच्या चौघांवर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात

आला आहे. वायुगळतीचं कारण शोधण्यासाठी मुंबई किंवा पुण्यातून तज्ज्ञांना बोलावलं जाणार आहे.

दरम्यान, आणखी ३३ मुलांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आलं असून, सात मुलांवर उपचार सुरू आहेत. 'गॅस वाहतूक बंद होत नाही, तोपर्यंत मुलांना शाळेत न पाठवण्याची भूमिका पालकांनी घेतली असून, उद्यापर्यंत गॅस वाहतूक करणारे ट्रक तिथून हलवावेत, अन्यथा बुधवारी आंदोलन केलं जाईल,' असा इशारा जयगड पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाने कंपनी व्यवस्थापनाला पत्र लिहून दिला आहे.

**<><><><><>**

सोलापूर जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय लोकअदालतीत १९ हजार ८३१ प्रकरणं सामंजस्यानं निकाली लागली. लोकअदालतीच्या माध्यमातून १० जोडप्यांचं वैवाहिक आयुष्य पुन्हा मार्गी लागलं तर काही आर्थिक प्रकरणात सुमारे ७१ कोटी ५ लाख १४ हजार ६०५ रुपयांची तडजोड करून वाद मिटवण्यात यश आलं. ही लोक अदालत यशस्वी होण्यासाठी सोलापूर जिल्हा न्यायालय आणि सोलापूरच्या जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांनी मोठं योगदान दिलं.

**<><><><><>**

स्त्रियांना समाजात समान स्थान मिळवून देण्याच्या उद्देशानं सुरू झालेली स्त्री मुक्ती संघटना ५०व्या वर्षात पदार्पण करत आहे. या निमित्ताने मुंबईत आज दिवसभर विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. गेल्या ५० वर्षांत सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक क्षेत्रात झालेले बदल आणि स्त्री चळवळीच्या वाटचालीचा स्त्रियांवर झालेला परिणाम या विषयावर या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रतिनिधी दोन सत्रांमध्ये आपापले विचार मांडणार आहेत.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात ११ डिसेंबर पासून सुरु झालेला सिकलसेल जनजागृती सप्ताह येत्या १७ डिसेंबर पर्यंत चालणार आहे. जिल्ह्यात २००९ पासून जवळपास १३ लाख ९६ हजार ३५३ इतक्या सिकलसेलच्या तपासण्या करणात आल्या आहेत. त्यात २४ हजार २२८ वाहक आणि १ हजार ६०६ सिकलसेलने बाधित रुग्ण आढळून आले आहेत.

**<><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यान ऑस्ट्रेलियात गॅबा इथं सुरु असलेल्या बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात दुसऱ्या दिवसाची सुरुवात ऑस्ट्रेलियानं कालच्या २८ धावांवरून केली. त्यानंतर ऑस्ट्रेलियान पहिले तीन बळी झटपट गमावले.

आजच्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या ७ बाद ४०५ धावा झाल्या होत्या.